# नियुक्ती
# जिल्हा व सत्र न्यायालय, नागपूर.

जिल्हा व सत्र न्यायालय नागपूर, यांच्या आस्थापनेवरील सफाईगार पदाकरीता १०(दहा) उमेदवारांची निवड सूची आणि ०५(पाच) उमेदवारांची प्रतिक्षा सूची तयार करण्यासाठी ऑफलाईन अर्ज मागविण्यात येत आहे.

विस्तृत/सविस्तर जाहिरात विहीत अर्जाच्या नमुन्यासह, जिल्हा व सत्र न्यायालय नागपूर, यांचे अधिकृत संकेतस्थळ https://districts.ecourts.gov.in/nagpur Or https://court.mah.nic.in या संकेतस्थळावर दिनांक ०१/०१/२०२१ च्या सकाळी ११ वाजता पासून उपलब्ध राहील. सदर नमुना डाउनलोड करता येईल.

पात्र उमेदवारांनी जाहिरातीमध्ये दिलेल्या नमुन्यातच अर्ज करावेत.

अर्ज नोंदणीकृत पोच देय डाकेने/पत्रा द्वारे म्हणजेच RPAD ने किंवा शिघ्र डाक सेवा पोच पावतीसह म्हणजेच स्पीड पोस्टने या कार्यालयास पाठवावेत. कोणत्याही परीस्थितीत हस्तप्रेक्षणाद्वारे म्हणजेच By hand अर्ज स्वीकारले जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

अर्ज सादर करण्याची अंतीम तारीख १५/०१/२०२१ सायंकाळी ५:३० पर्यंत आहे.

मुदती नंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

अधिक माहिती करिता जिल्हा व सत्र न्यायालय, नागपूर यांच्या https://districts.ecourts.gov.in/nagpur Or https://court.mah.nic.in या अधिकृत संकेत स्थळावर भेट दयावी.

# <u>जाहीरात</u>

दिनांक : ०१/०१/२०२१

**०१.** जिल्हा व सत्र न्यायालय, नागपूर, यांच्या आस्थापनेवरिल, 'सफाईगार' या पदाकरिता पात्र १०(दहा) उमेदवारांची निवड सूची व ०५(पाच) उमेदवारांची प्रतिक्षा सूची तयार करण्याकरिता, पात्र उमेदवारांकडून विहित नमुन्यात ऑफलाईन (off line) पध्दतीने अर्ज मागवण्यात येत आहेत.

**०२.** (उच्च न्यायालयाच्या अधिसूचना क्र. नियम/एक्स-२३१९/७१, दि. २० नोव्हेंबर, २०१९ नुसार, ०१% पदे दिव्यांग व्यक्तीसाठी आरक्षित ठेवण्यात येत आहेत.)

**०३. पात्रतेचे निकष :-**

* **पदाचे नाव :-** 'सफाईगार'

* **अर्हता :-** लिहीता वाचता येणे

**(० ते १० वी अनुत्तिर्ण उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल)**

या पदाकरिता पात्र होण्यासाठी उमेदवार :-

**(अ)** सुदृढ शरीरयष्टी आणि सदर पदाच्या कामासाठी सर्वार्थाने सक्षम असणे आवश्यक आहे.

**(ब)** दि. २८/०३/२००५ नंतर जन्मास आलेल्या मुलांमुळे उमेदवाराच्या हयात मुलांची संख्या एकूण दोन (०२) पेक्षा जास्त असू नये.

* **वयोमर्यादा :-**

**(अ)** सर्वसाधारण प्रवर्गाकरिता १८ वर्षापेक्षा कमी वयाचा आणि ३८ वर्षापेक्षा जास्त वयाचा नसावा.

**(ब)** अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग किंवा महाराष्ट्र शासनाद्वारे, दि. २८/०३/२०१८ रोजी, त्यावेळेपुरत्या, विनिर्दिष्ट केलेल्या विशेष मागास प्रवर्गाकरिता ४३ वर्षापेक्षा जास्त नसावा.

**(क)** शासन निर्णय क्र. एसआरव्ही-१०७७/३५७४६/१४३३/१६-अ, दि. २३/०५/१९७८ नुसार दिव्यांग व्यक्ती, जर त्या अन्यथा योग्य व सदर पदाची कर्तव्ये पार पाडण्याकरिता सक्षम असेल तर, त्याच्या बाबतीत सेवा प्रवेशासाठी, विहित केलेली उच्च/कमाल वयोमर्यादा ४५ वर्षांपर्यंत शिथिलक्षम केली आहे.

* **कामाचे स्वरूप :-**

**(अ)** निवड झालेल्या उमेदवारांची, जेथे नियुक्ती केली जाईल, तेथिल न्यायालय ईमारतीची, ईमारतीच्या परिसराची, निवासी कार्यालयांची व प्रसाधनगृहांची नियमित स्वच्छता, व साफसफाई करणे आणि निगा राखणे.

**(ब)** न्यायालय ईमारतीच्या आवारातील बागेची निगा राखणे.

**(क)** वरिल **(अ)** व **(ब)** मध्ये नमूद केलेल्या कामाव्यतिरिक्त प्रभारी अधिकारी यांचे निर्देशानुसार सर्व आवश्यक ती कामे करणे.

**०४. पदाची वेतनश्रेणी ७ वे वेतन आयोगानुसार :-**

वेतन स्तर एस-१ रू.१५०००-४७६०० अधिक शासनाने वेळोवेळी मंजुर केलेले इतर भत्ते.

**:- उमेदवारांकरिता सूचना :-**

**(१)** पात्र उमेदवारांनी जाहिरातीमध्ये दिलेल्या नमुन्यातच अर्ज करावा.

**(२)** अर्ज पाठवायच्या बंद पाकीटावर "सफाईगार पदाकरिता अर्ज" असे लिहून 'प्रबंधक', जिल्हा व सत्र न्यायालय नागपूर, यांच्याकडे पाठवावेत.

**(३)** उमेदवारांचे अर्ज केवळ नोंदणीकृत पोच देय डाकेने/पत्राने म्हणजेच RPAD ने किंवा शिघ्र डाकसेवा पोच पावतीसह म्हणजेच Speed Post ने जिल्हा व सत्र न्यायालय, आकाशवाणी चौक, सिव्हील लाईन्स, नागपूर, जिल्हा नागपूर - ४४०००१. या कार्यालयास दि. १५.०१.२०२१ **(सुट्टींचे दिवस वगळता)** रोजी सायंकाळी ५:३० वाजेपर्यंत अथवा त्यापूर्वी पोहोचतील, अशा अंदाजाने पाठवावेत.

**(४)** कोणत्याही परिस्थितीत हस्तप्रेक्षणाद्वारे म्हणजेच By hand अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

(५) अर्ज करण्याच्या अंतिम तारखेनंतर/विहित मुदतीनंतर आलेल्या अर्जांचा तसेच वर नमूद केलेल्या मार्गा व्यतिरिक्त इतर मार्गाने प्राप्त झालेल्या अर्जांचा, पोस्टामार्फत विलंबाने प्राप्त झालेल्या अर्जांचा, बंद पाकीटावर 'सफाईगार' पदाचे नाव नमूद नसलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

(६) अधिसूचीत करण्यात आलेल्या पदांची संख्या ढोबळमानाने परिगणित केलेली असून, त्यात आवश्यकतेनुसार बदल होऊ शकतो. अधिसूचीत केलेल्या संख्येइतक्या उमेदवारांची निवड केली जाईलच असे नसून, निवड समिती, पात्र उमेदवारांची उपलब्धता आणि/अथवा अन्य समर्थनीय कारण आणि प्रशासनाची आवश्यकता विचारात घेऊन अधिसूचीत संख्येपेक्षा कमी/जास्त उमेदवारांची निवड करू शकते.

(७) अर्ज करणा-या उमेदवारांना सुस्पष्ट जाणिव करून देण्यात येत आहे की, त्यांनी उमेदवारी अर्ज सादर केला म्हणून त्यांना चाचणी/मुलाखतीस बोलविण्याचा कोणताही अधिकार प्राप्त होत नाही. निवड समिती, प्रशासकीय निकड विचारात घेऊन प्राप्त झालेले अर्ज लघुसूचीत (Short Listed) करू शकेल व लघुसूचीत होण्यात यशस्वी झालेल्या उमेदवारांचाच पुढील टप्प्यांसाठी विचार केला जाईल. उमेदवाराची उच्च शैक्षणिक अर्हता आणि/अथवा निवड समिती ठरविल ते निकष लागू करून, त्यांची लघुसूची तयार करण्याचा अधिकार निवड समितीस आहे.

(८) उमेदवारांनी आपले अर्ज जिल्हा न्यायालयाच्या संकेतस्थळावरून डाऊनलोड करून घेऊन, केवळ ए-४ आकाराच्या, चांगल्या दर्जाच्या कागदावर, सुस्पष्ट व सुवाच्च अक्षरात भरून, दिनांक १५ जानेवारी, २०२१ रोजी सायंकाळी ०५.३० वाजेपर्यंत **(सुट्टींचे दिवस वगळता)** आधी नमूद केल्याप्रमाणे पोस्टाने पाठवावेत.

**उमेदवाराने अर्जासोबत कोणतीही मुळ कागदपत्रे/प्रमाणपत्रे अथवा सांक्षाकित प्रती जोडू नयेत. उमेदवारांना कागदपत्रे सादर करण्याबाबत योग्य वेळी सूचना दिली जाईल.**

**या कार्यालयाने भरती प्रक्रियेकरिता कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारलेले नसुन ती पूर्णपणे विनाशुल्क आहे, याची उमेदवारांनी**

**नोंद घ्यावी. तसेच अर्जासोबत कोणत्याही प्रकारचे शुल्क जसे की, दर्शनी धनाकर्ष** (Demand Draft), **प्रदानादेश** (Pay Order), **धनादेश** (Cheque) **इत्यादी जोडू नये.**

**(९)** उमेदवारांनी आपले अर्जावर निर्दिष्ठ जागी त्याचे/तीचे "पासपोर्ट" आकाराचे नवीनतम छायाचित्र चिकटवावे आणि त्यावर आपली स्वाक्षरी करावी. स्वाक्षरीची सुरूवात छायाचित्रावर करून तिचा काही भाग छायाचित्राबाहेर येईल अशा रितीने स्वाक्षरी करावी.

**(१०)** उमेदवारांनी आपले अर्जासोबत स्वत:चा पत्ता असलेला लिफाफा ५रुपयाचे डाक तिकीट लावुन पाठवावा. लघुसूचीत पात्र ठरला तर त्यास त्याच पाकीटाद्वारे आणि साध्या टपालाने, पुढील चाचणीकरीता बोलविले जाईल.

**(११)** लघुसूचीत (Short Listed) होण्यास पात्र ठरलेल्या उमेदवारांची नावे जिल्हा व सत्र न्यायालयाच्या संकेतस्थळावर तसेच जिल्हा न्यायालय, नागपूरचे सुचना फलकावर अधिसूचीत करण्यात येईल. पुढील चाचणीकरीता बोलाविण्याबाबतची सूचना ही साध्या टपालाद्वारे दिली जाणार असल्यामुळे उमेदवारांनी वेळोवेळी संकेतस्थळास भेट देणे त्यांचे हिताचे राहील.

**(१२)** लघुसूचीत झालेल्या उमेदवारांनी जिल्हा व सत्र न्यायालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या ओळखपत्राचा नमूना डाऊनलोड करून घेऊन, व्यवस्थितरित्या भरून आणि त्यावर आपले नवीनतम "पासपोर्ट" आकाराचे छायाचित्र (पूर्वी सादर केलेले) चिकटवून आणि त्यावर दिलेल्या जागी काळया शाईने स्वाक्षरी करून जिल्हा व सत्र न्यायालयाला दिलेल्या तारखांना सादर करावे आणि आपले प्रवेश पत्र प्राप्त करून घ्यावे.

**(१३)** ओळखपत्र सादर करतांना उमेदवाराने आपली ओळख पटविणारा (ID Proof) कोणताही एक दस्त, जसे की आधार कार्ड, पारपत्र, वाहन चालविण्याचा परवाना, मतदान ओळखपत्र, पॅन कार्ड, छायाचित्र असलेले ओळखपत्र, त्यांच्या मालकाने अथवा शैक्षणिक संस्थेने प्रदान केलेले, इत्यादी, सादर करावे.

**(१४)** ऐन वेळेची घाई गर्दी टाळण्यासाठी उमेदवारांना सूचीत करण्यात येते की,

त्यांनी त्यांचे अर्ज पुरेसा कालावधी शिल्लक असतांनाच सादर करावेत.

**(१५)** जे उमेदवार या पुर्वीच शासकीय सेवेत आहेत, त्यांनी त्यांचे विभाग/कार्यालय प्रमुखाची लेखी परवानगी घेऊनच अर्ज सादर करावा. अशी परवानगी मुलाखतीच्या वेळी सादर करावी. तसेच उमेदवारांनी आपले अर्ज आपापल्या विभाग/कार्यालय प्रमुखांमार्फत पाठविण्याची आवश्यकता नाही.

**(१६)** एका उमेदवाराने केवळ एकच अर्ज सादर करावा.

**(१७)** अपूर्ण अर्ज किंवा असा अर्ज, जो उमेदवाराने सादर केलेल्या तपशिलामुळे त्यास पदासाठी अपात्र ठरवेल, बाद ठरविला जाईल आणि त्यांबाबत कोणतीही तक्रार किंवा उजर ऐकला जाणार नाही.

**(१८)** लघुसूचीत झालेल्या उमेदवारांची श्रमचाफल्य, क्रियाशिलता चाचणी व स्वच्छता चाचणी तसेच निवड समितीने ठरविल्यानुसार अन्य सुयोग्य कोणतीही चाचणी घेतली जाईल. त्याबाबतच्या सूचना जिल्हा व सत्र न्यायालय, नागपूरचे संकेतस्थळावर आणि जिल्हा न्यायालयाच्या सूचना फलकावर दिल्या जातील. याकरीता संबंधीत उमेदवारांनी वेळोवेळी जिल्हा व सत्र न्यायालय, नागपूरचे संकेतस्थळास भेट देणे त्यांचे हिताचे राहील.

**(१९)** त्यात यशस्वी झालेल्या उमेदवारांनाच मुलाखतीकरिता बोलविले जाऊ शकेल.

**(२०)** जे उमेदवार मुलाखतीकरीता पात्र ठरतील व मुलाखतीकरीता बोलविले जाईल अशा उमेदवारांनी मुलाखतीचेवेळी खालील प्रमाणपत्रांच्या साक्षांकीत प्रती आणि त्यांनी मूळ कागदपत्रे जिल्हा व सत्र न्यायालयाने नेमून दिलेल्या अधिका-याकडे सादर करावीत.

**अ)** जन्मतारखेचा दाखला किंवा पुरावा.

**ब)** उमेदवाराने मुळ अर्जामध्ये नमुद केलेल्या, दोन सन्माननीय व्यक्तींनी दिलेले चारित्र्याचे दाखले तसेच त्याचे विरूद्ध कुठल्याही न्यायालयात कोणताही फौजदारी खटला चालू किंवा प्रस्तावित नसल्याचे प्रमाणपत्र, कोणताही फौजदारी खटला असल्यास त्याचा तपशिल.

**क)** अर्हतेच्या रकान्यामध्ये नमुद केलेल्या अर्हता/परीक्षा उत्तीर्ण केल्याबाबतचा

दाखला.

**ड)** 'अन्य अर्हता' या रकान्यामध्ये नमूद केल्यानुसार अर्हता/परीक्षा उत्तीर्ण केल्याबाबतचा दाखला.

**इ)** शासकीय जिल्हा शल्यचिकित्सक/वैद्यकीय अधिक्षक यांनी दिलेला अपंगत्वाचा दाखला, लागु असल्यास.

**ई)** शासनाच्या सक्षम अधिका-याने दिलेला जातींचा दाखला, जेथे लागु असेल तेथे.

**उ)** जिल्हा न्यायालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेले लहान कुटुंबाबाबतचे प्रतिज्ञापत्र **नमूना-ए,** मूळ.

**ऊ)** उमेदवार यापूर्वीच शासकीय सेवेत कार्यरत असेल तर संबंधित विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र.

**(२१)** प्राप्त झालेल्या अर्जांची लघुसूची/चाचणी/मौखिक चाचणी इ. बाबींसाठी कमाल गुण आणि पुढील टप्प्यासाठी यशस्वी होण्याकरिता ठरविण्यात आलेले निम्नतम पात्रता गुण (बेंच मार्क) ठरविण्याचा अधिकार निवड समितीस असून त्याबाबत निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.

**(२२)** उमेदवारांना चाचणी/मुलाखतीस बोलविले गेले तर त्यांनी निश्चित केलेल्या तारखांना आणि ठिकाणी स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल.

**(२३)** उमेदवाराने जर निवड प्रक्रियेच्या संदर्भात स्वत: किंवा कोणामार्फत निवड समितीच्या सदस्यांना अथवा न्यायिक विभागाच्या अधिका-यांना भेटण्याचा किंवा त्यांचेवर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्यास अपात्र ठरविण्यात येईल आणि या बाबतीत निवड समितीचा निर्णय अंतीम राहील.

**(२४)** उमेदवाराची निवड ही काटेकोरपणे, उमेदवारांना सर्व चाचणी आणि मुलाखतीत मिळालेल्या गुणांच्या आधारे तयार करण्यात येणा-या गुणवत्ता क्रमानुसार करण्यात येईल.

**(२५)** निवड सुची/प्रतिक्षा सुची ही मा. उच्च न्यायालयाच्या मान्यतेस अधीन राहून, उच्च न्यायालय विहीत करेल, अशा कालावधीसाठी वैध राहील.

**(२६)** निवड झालेल्या उमेदवाराची सेवा ही मा. उच्च न्यायालय आणि महाराष्ट्र शासनाद्वारे वेळोवेळी तयार करण्यात आलेल्या नियमांप्रमाणे असेल.

**(२७)** उमेदवारांना शासनाच्या प्रचलित नियमांनुसार अंशदान निवृत्ती वेतन योजना व शासकीय नोकरीच्या प्रयोजनार्थ गठीत सर्व अटी व शर्ती लागू राहतील.

**(२८)** उमेदवारांची सेवा त्यांच्या बाबत संबंधित पोलीस अधिक्षक/पोलीस आयुक्त कार्यालयाकडून प्राप्त करवून घेतल्या जाणा-या चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्रास अधीन राहून असेल.

**(२९)** चुका टाळण्यासाठी, प्रत्यक्ष अर्ज सादर करण्यापूर्वी उमेदवारांनी संकेतस्थळावर दाखविण्यात येणा-या सूचना लक्षपूर्वक वाचाव्यात.

**(३०)** प्रत्येक उमेदवाराचा एकच अर्ज असेल, जर एकाच उमेदवाराने अनेक अर्ज भरले तर, फक्त पहिला अर्ज विचारात घेतला जाईल. जर आवश्यक अर्हतेप्रमाणे उमेदवार अर्हताप्राप्त नसेल, तर त्या पदाचा पर्याय त्याच्यासाठी उपलब्ध नसेल.

**(३१)** उमेदवाराने असे नमूद करावे की, त्यास राखीव प्रवर्गाचा म्हणून विचारात घेण्याची इच्छा आहे की, त्यास खुल्या प्रवर्गाचा उमेदवार म्हणून विचारात घेण्याची इच्छा आहे. जर उमेदवाराने त्यास राखीव प्रवर्गाचा म्हणून विचारात घेण्याचा पर्याय स्वीकारला आणि जर त्याने त्या प्रवर्गाचा म्हणून त्याचा विचार करण्यासाठी पात्र ठरविणारी प्रमाणपत्रे सादर केली नाहीत तर, त्याने चुकीची माहिती दिली म्हणून त्यास अपात्र ठरविण्यात येईल, आणि त्याचा खुल्या प्रवर्गासाठी विचार करण्यात येणार नाही.

**(३२)** उमेदवारांनी याची नोंद घ्यावी की, उमेदवारांनी दिलेली माहिती खरी आहे असे समजून त्यांची पात्रता निर्धारित करण्यात येईल. जर एखाद्या उमेदवाराने दिलेली माहिती ही खोटी, सदोष अथवा चुकीची आहे, असे आढळुन आल्यास, अशा उमेदवारास केवळ अनर्ह ठरविण्यात येईल असे नव्हे तर त्यावर खटलासुध्दा भरण्यात येईल. अशा उमेदवारास कोणत्याही परीक्षेस बसण्यास मनाई करण्यात येईल. त्यास जिल्हा न्यायालयांतील कोणत्याही पदासाठी अर्ज करण्यास मनाई करण्यात येईल.

**(३३)** सफाईगार पदाकरिता ज्या उमेदवारांची नावे लघुसूचित करण्यात आली आहेत अशा उमेदवारांना सफाईगार पदाकरिता १० गुणांची स्वच्छता व १० गुणांची क्रियाशिलता चाचण्यांकरिता बोलाविण्यात येईल. व त्यांना सेवा भरती समिती यांचे कडुन निश्चित केल्या जाणा-या 'कट ऑफ' गुण मिळविणे आवश्यक राहील. अशा सर्व उमेदवारांना स्वच्छता व क्रियाशिलता चाचणीमध्ये मिळालेल्या जास्तीत जास्त गुणांचे आधारे नमुद पदांच्या संख्येच्या तीन पट संख्येएवढया उमेदवारांना मुलाखतीसाठी उपस्थित राहण्यास सांगण्यात येईल. जर १:३ हे प्रमाण राखण्यासाठी लघुसूचित केलेल्या उमेदवारांपैकी शेवटच्या उमेदवाराइतके गुण मिळवणारे एकापेक्षा

अधिक उमेदवार असतील तर, अशा सर्व उमेदवारांना मुलाखतीकरिता बोलाविले जाईल. अशी तयार करण्यात आलेली यादी मुलाखतीच्या वेळापत्रकासहित जिल्हा न्यायालयाच्या कार्यालयात प्रदर्शित करण्यात येईल.

**(३४)** सदर समिती सफाईगार पदासाठी अंतिम निवड/प्रतिक्षायादी तयार करेल ज्यात उमेदवारांनी प्रत्येक चाचणी परीक्षेत एकुण मिळविलेल्या गुणांचा उल्लेख असेल.

**(३५)** समितीने असे ठरविले आहे की, जेथे निवड करण्यासाठी निम्नतम पात्रता गुण (Bench mark) निश्चित करण्यात आले नसतील तेथे असे निम्नतम पात्रता गुण ३५ टक्के असावेत आणि अनुसूचित जाती/अनुसूचित जमातीच्या उमेदवारांसाठी हे गुण ३० टक्के राहतील. सदर प्रक्रिया बंधनक ारक नसल्यामुळे धोरणात्मक असेल यांची नोंद घ्यावी.

**(३६)** निवड/प्रतिक्षा यादीतील उमेदवारांची संख्या ही जाहिरातीत दिलेल्या पदांपेक्षा जास्त नसेल. उच्च न्यायालयाच्या मान्यतेनंतरच निवड/प्रतिक्षा सूची, जिल्हा न्यायालय, नागपुर न्यायालयाच्या सूचना फलकावर दर्शविली जाईल आणि जिल्हा न्यायालयाच्या उपरोल्लिखित अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द केली जाईल.

**(३७)** सेवाप्रवेश प्रक्रियेच्या वेळापत्रकात या कार्यालयाचे नियंत्रण नसलेल्या कोणत्याही अकल्पित घटनांच्या घडण्यासापेक्ष बदल होऊ शकतो. असा बदल वेळोवेळी कार्यालयाच्या सूचनाफलकावर व अधिकृत संकेतस्थळावर अधिसूचित करण्यात येईल.

**<u>प्रतिज्ञापत्र</u>** (नमुना-अे)

मी, श्री/श्रीमती/कुमारी.........................................................................

श्री .................................................................यांचा/यांची मुलगा/मुलगी वय.........वर्षे,राहणार

.........................................................................................याद्वारे पुढीलप्रमाणे जाहीर

करतो/करते की,

१) मी....................................................या पदासाठी माझा अर्ज सादर केला आहे.

२) आज रोजी मला ...............(संख्या) इतकी मुले आहेत. यापैकी दिनांक २८ मार्च २००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या.........आहे. (असल्यास, जन्मदिनांक नमुद करावा)

३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर, दिनांक २८ मार्च, २००६ नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी मी अपात्र होईन याची मला जाणीव आहे.

स्थळ :

दिनांक : (उमेदवाराची स्वाक्षरी)

# जिल्हा व सत्र न्यायालय, नागपूर
# सफाईगार पदासाठी अर्जाचा विहित नमुना

| पासपोर्ट आकाराचे छायाचित्र |
|---|

**पदाचे नांव :-** ______________________

०१) उमेदवाराचे संपूर्ण नांव :- ........................ .......................... .........................
(आडनांव प्रथम) (आडनांव) (प्रथम नांव) (वडिलांचे/पतीचे नांव)

०२) पत्रव्यवहाराचा पत्ता :- ...............................................................................
(स्थायी) ...............................................................................
पिनकोड ..............भ्रमणध्वनी कमांक(कार्यरत) ..............
ई-मेल, असल्यास .........................................................

०३) अस्थायी पत्ता :- ...............................................................................
...............................................................................
भ्रमणध्वनी कमांक(कार्यरत कमांकाचे व्यतिरिक्त)...........

०४) सेवायोजन कार्यालयातील नोंदणी कमांक, असल्यास :- ..........................................

०५) लिंग (पुरूष / स्त्री) :- ..........................................

०६) जात व प्रवर्ग :- ..........................................

०७) जन्म दिनांक :- ..........................................

०८) उमेदवाराचे जाहिरातीच्या दिवशीचे वय :- ..............वर्ष ..............महिने ................दिवस.

०९) उमेदवार दिव्यांग आहे काय :- ....................................

१०) उमेदवार सध्या शासकीय सेवेत आहे काय? :- होय / नाही
असल्यास-तपशिल :- ..................................................................

११) उमेदवार प्रकल्पग्रस्त आहे काय. :- .......................................

१२)	उमेदवार अविवाहीत/ विवाहीत आहे काय? :- ......................................

१३)	उमेदवारास मराठी लिहीता/ वाचता येते काय आणि समजते काय ? :- होय / नाही

१४)	शैक्षणिक अर्हतेचा तपशिल (असल्यास) :-

| **अर्हता** | **मंडळ / विद्यापीठ** | **उत्तीर्ण झाल्याचे वर्ष** | **प्राप्त गुण** | **कमाल गुण** | **गुणांची टक्केवारी** | **ग्रेड/श्रेणी** | **किती प्रयत्नात उत्तीर्ण झाले** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |

१५)	अन्य अर्हता, जसे संगणक/टंकलेखन / श्रृतलेखन (असल्यास).

| अ.क्र. | कोर्सचे नांव | शब्द प्रति मिनिट | शासकीय संस्था/मंडळ ज्यांनी टंकलेखन/श्रृतलेखनाचे/संगणक प्रमाणपत्र दिले. | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | प्राप्त ग्रेड |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

१६)	कामाचा पुर्वानुभव आहे काय, असल्यास तपशिल. :- ..............................................................

१७)	न्यायसंस्थेत कार्यरत नातेवाईकांचा संपूर्ण तपशिल, असल्यास. :- ............................................................

१८)	उमेदवारांस ओळखत असलेल्या दोन प्रतिष्ठित व्यक्तींची नांवे व पत्ते तसेच त्यांचे सदरील प्रमाणपत्रे अर्जासोबत सादर करावीत. :- १. .......................................................
.......................................................
२. ....................................................
....................................................

१९)	उमेदवारावर पूर्वी फौजदारी खटला/शिस्तभंगाची कार्यवाही झाली होती काय/ शिक्षा झाली होती काय / खटला / कार्यवाही प्रलंबीत आहे काय, असल्यास तपशिल. :- .......................................................
.......................................................

# <u>घो ष णा</u>

मी वर नमुद उमेदवार याद्वारे शपथपूर्वक घोषीत करतो / करते की मला शासकीय सेवेकरिता अपात्र घोषीत केलेले नाही. तसेच मला फौजदारी गुन्हयात अटक वा शिक्षा झालेली नाही आणि माझ्याविरूध्द कोणत्याही प्रकारची शिस्तभंगाची कार्यवाही / फौजदारी न्यायालयामध्ये खटला प्रलंबित अथवा प्रस्तावित नाही.

मी याद्वारे शपथपूर्वक असेही घोषीत करतो / करते की अर्जामध्ये नमूद केलेली माहिती माझ्या माहितीनुसार सत्य आणि बरोबर आहे. त्यातील कोणतीही गोष्ट खोटी / चुकीची आढळल्यास मला निवड प्रक्रियेपासून अपात्र घोषीत केले जाईल आणि जर निवड / नेमणुक झाल्यास, माझी सेवा कोणतीही सूचना दिल्याविना समाप्त केली जाईल याची मला जाणीव आहे.

तसेच दिनांक २८ मार्च २००५ नंतर जन्मलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा जास्त असल्यास मला सदर पदावरून अपात्र ठरविण्यात येईल.

उमेदवारी अर्ज सादर केला म्हणून मला चाचणी / मुलाखतीस बोलाविले जाण्याचा कोणताही अधिकार प्राप्त होत नाही याची मला जाणिव आहे.

दिनांक :- ...............................................

उमेदवाराची स्वाक्षरी

ठिकाण :- ...............................................

उमेदवाराचे नांव.

# <u>सेवाप्रवेश कमसूची</u>

| अ.क्र | दिनांक | प्रक्रिया |
|---|---|---|
| ०१ | ०१.०१.२०२० | जाहिरातीची स्थानिक वुत्तपत्रात व जिल्हा न्यायालयाच्या संकेत स्थळावर प्रसिध्दी |
| ०२ | १५.०१.२०२१ | ऑफलाईन अर्ज स्विकारण्याची अंतिम दिनांक |
| ०३ | ३०.०१.२०२१ | प्राप्त अर्जाची छाननी करुन सुचिबध्द केलेल्या पात्र उमेदवारांची सुची जिल्हा न्यायालय,नागपुरच्या सूचना फलकावर तसेच संकेतस्थळावर प्रसिध्द |
| ०४ | १४.०२.२०२१ ते १९.०२.२०२१ च्या दरम्यान | उमेदवारांची क्रियाशिलता व स्वच्छता चाचणी. |
| ०५ | २०.०२.२०२१ | क्रियाशिलता व स्वच्छता चाचणीचा निकाल जिल्हा न्यायालयाच्या सूचना फलकावर तसेच संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यिात येईल. |
| ०६ | ०८.०३.२०२१ ते ११.०३.२०२१ | लघुसूचित पात्र उमेदवारांची मुलाखती. |
| ०७ | पात्र उमेदवारांची अंतिम यादी मा.उच्च न्यायालयास मान्यतेकरिता पाठविल्या जाईल त्यानंतर ती मंजुर होवुन आल्यानंतर जिल्हा न्यायालय, नागपुर सूचना फलकावर तसेच संकेतस्थळावर प्रसिध्द केल्या जाईल | |

टिप :- उपरोक्त क्रमसुचीनुसार (वेळापत्रकानुसार) जर कोणत्याही दिवशी वर ठरल्यानुसार कार्यक्रम (चाचणी/मुलाखत) घेता आली नाही तर तो कार्यक्रम पुढील दिवशी किंवा निवड समितीने ठरविलेल्या दिवशी घेण्यात येईल. तशी सुचना जिल्हा न्यायालय, नागपुर च्या संकेतस्थळावर प्रसिध्द केल्या जाईल.